# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०७/०३/२०२५ (शुक्रवार)**

---

## मा. पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी घेतली सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी आणि बिट अधिकरी /अंमलदारांची बैठक

दिनांक ०६/०३/२०२५ रोजी पोलीस भवन ,नागपुर येथे मा. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रमीण जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली नागपुर ग्रामीण जिल्हयातील बीट अधिकारी /अंमलदार यांच्या कामगिरीचा आढावा घेण्याकामी बैठक आयोजीत करण्यात आली होती.सदर बैठकीत श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रमीण जिल्हा, सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी ,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि पोलीस स्टेशनचे बीट अधिकारी आणि अंमलदार हजर होते. मा पोलीस अधिक्षकांनी सर्व बीट अधिकारी अंमलदारांना यांना एनडीपीएस कायदया अंतर्गत जास्तीत जास्त कारवाई करण्याचे आदेशीत केले.तसेच शाळा महाविदयालय परीसरात जास्तीत जास्तीत अवैध अंमली पदार्थ एनडीपीएस कायदयान्वये कारवाई करण्याबाबत आदेशीत केले.बीट अधिकारी /अंमलदार अवैध अंमली पदार्थ एनडीपीएस कायदयान्वये दाखल गुन्हयांचा सखोल तपास करतील तसेच उपविभागिय पोलीस अधिकारी सदर कार्यवाहीचा आढावा घेवुन तपासी अंमलदारांना सदर गुन्हयांच्या तपासा बाबत सुचना देवुन त्यांची पुर्तता करवुन घेईल.

सदर बैठकीत **आगामी होळी आणि रमजान सणा संबधाने सुध्दा मा. पोलीस अधिक्षक यांनी सुचना दिल्या** . सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी आणि बीट प्रमुखांना शांतता किमीटी मिटींग घेण्याबाबत, बीट मध्ये सक्त पेट्रोलींग करण्याबाबत,डिजे वर कारवाई बाबत,रेकॉर्ड वरील आरोपीतांना वारंवार चेक करण्याबाबत, अवैध गोवंश वाहतुकी कारवाई करणे बाबत, ड्रक ॲड ड्राइव्ह कारवाई करणे बाबत तसेच इतर

मुद्दयांवर सविस्तर  सुचना देवुन त्यांना कर्तव्यात कसुरी न करता कारवाई करण्याबाबत अदेशीत केले. तसेच मा पोलीस अधिक्षक यांनी उपस्थित अधिकारी यांच्या अडीअडचणी जाणुन घेवुन त्यांचे निराकरण करण्यात आले.







## फसवणुकीचा गुन्हा उघड , ८७ हजार ५०० रूपयाचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक ०३/०८/२०२४ रोजी पोलीस स्टेशन सावनेर येथे फिर्यादी नामे सविता भिमराव बाभुळकर, रा वार्ड क्र १,कोटोडी ता. सावनेर या गडकरी चौक सावनेर येथुन बसस्टॅड सावनेर येथे जात असतांना बांगडे ज्वलेर्स दुकानासमोर एक अज्ञात स्त्री आणि एक अज्ञात पुरूष हे फिर्यादी जवळ आले.त्यापैकी अज्ञात पुरूष आरोपीने फिर्यादीला मी महाराज आहे अशी बतावणी करून तोतयेगिरी कडुन फिर्यादीचे सोन्याचे दागिने आणि अॅड्रॉइड फोन असा एकुन १,७५,०००/— रूपये चा मुद्देमाल फिर्यादीची फसवणुक

करून नेला होता. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन सावनेर येथे अप क्र ७०८/२०२४ कलम ३१९(२) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयाचा तपास सावनेर पोलीस करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांच्या पथकाने सुध्दा समांतर तपास सुरू केला होता. दिनांक ०६/०३/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला सदर गुन्ह्याचा तपास करीत असता गुप्तबातमीदार कडुन माहिती मिळाली की, सदर गुन्हा हा आरोपी नामे नादर जयदी तालीम जयदी, वय ५२ वर्ष, रा साई नगर ,निर्माण कंपनी जवळ, कळमना नागपूर ह. मु. येरखेडा कामठी याने केला आहे. पोलीसांनी आरोपीला ताब्यात घेवुन विचारपुस केली असता सदर गुन्हा नमुद आरोपीने केला असल्याची त्यांना खात्री पटली. नमुद अरोपी कडुन पोलसांनी **१) रोख रक्कम १,७५,००/—रुपये, २) मोपेड गाडी क्रमांक एम एच २७ बी.यु ६१९० किमती ७०,०००/— रूपये असा एकूण किंमत ८७,५००/—रुपयांचा मुद्देमाल केला आहे.** सदर गुन्हयाचा पुढील तपास सावनेर पोलीस करीत आहेत. **आरोपीला अटक करण्यात आली आहे.**